# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/ ४१/२०१४-१५/१५४ दिनांक : २२.०८.२०१४

**<u>आदेश केस क्र.४१/१४-१५</u>**

श्री.भरमु आण्णा मगदुम,
१४/५६७/२८, नाईक मळा,
इचलकरंजी, जि.कोल्हापूर. — अर्जदार

**विरुध्द**

१) कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
मंडल कार्यालय, कोल्हापूर.

२) कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
विभागीय कार्यालय, इचलकरंजी. — विरुध्द पक्षकार

३) उपकार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
उपविभागीय कार्यालय, अ, इचलकरंजी.

**कोरम:-** १. श्री.बी.जी.पवार,अध्यक्ष
२. श्री.जी.बी.पानकर, सदस्य सचिव
३. श्री.जी.सी.लेले,सदस्य

**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग**
**(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)**
**विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार**

**<u>न्याय निर्णय</u>**

श्री.बी.जी.पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री.भरमु आण्णा मगदुम,इचलकरंजी, यांनी आपल्या प्रतिनिधीमार्फत वितरण कंपनी,मंडल कार्यालय,कोल्हापूर,यांचेविरुध्द गा-हाणे दाखल केले आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

ग्राहकाने इचलकरंजी येथील गट क्र.३७९/२ येथे ५ एच.पी.शेतीवापरासाठी बोअरवर विद्युतपुरवठा मिळावा म्हणून दि.३०.०१.२०१३ रोजी मागणी केली. ग्राहकास दि.१४.५.२०१३ पर्यंत चलन मिळाले नव्हते. दि.२९.५.२०१३ रोजी ग्राहकाने चलन भरले आहे. चलन देण्यास झालेल्या विलंबापोटी भरपाई मिळणे आवश्यक आहे. दि.२०.५.२०१३ पासून प्रत्यक्षात वीज जोडणी मिळेपर्यंतच्या कालावधीची भरपाई मिळावी व वीजजोडणी मिळावी. अंतर्गत कक्षाने दि.२५.६.२०१४ दिलेला आदेश मान्य नाही.

वितरण कंपनीने आपल्या दि.१७.०७.२०१४ च्या लेखी अहवालात ग्राहकाचा दि.३०.०१.२०१३ रोजी अर्ज मिळाल्याचे मान्य केले. उपविभागीय कार्यालयाने सर्व्हे करुन तांत्रिक माहितीसह अहवाल विभागीय कार्यालयाकडे मंजुरीसाठी पाठविला. ग्राहकास दि.१४.५.२०१३ रोजी पैसे भरण्यासाठी फर्म कोटेशन देण्यात आले. ग्राहकाने कोटेशनची रक्कम दि.२९.५.२०१३ रोजी भरली. चाचणी अहवाल दि.२४.६.२०१३ रोजी दिला. एप्रिल महिन्यात आर्थिक वर्ष सन २०१३-२०१४ मध्ये तरतुदीप्रमाणे शेतीपंप ग्राहकास मंजुरी मिळणेस उशीर झाला. वीजजोडणीचे काम लवकरात लवकर करण्यात येईल असे सांगितले.

ग्राहकाचे प्रतिनिधी व वितरण कंपनीतर्फे श्री.जाधव,सहा.अभियंता, इचलकरंजी, उपस्थित होते. ग्राहकाने झालेल्या विलंबापोटी भरपाई मिळावी व वीजजोडणी मिळावी अशी मागणी केली आहे. वितरण कंपनीचे अधिकारी श्री.जाधव यांनी अतिरिक्त कार्यकारी अभियंता यांच्या सहीने लेखी अहवाल सादर केला. ग्राहकास लागणा-या लाईनचा सर्व्हे दि.१४.८.२०१४ रोजी कंत्राटदार यांना बोलावून केले आहे. कंत्राटदाराने लाईनचे काम पूर्ण केल्यानंतर लगेच वीज कनेक्शन देण्यात येईल. सुनावणीनंतर श्री.जाधव यांनी मंचासमोर लेखी स्वरुपात म्हणणे मांडून वीज वाहिनी एच.टी.लाईन - २.१ कि.मी., ट्रान्सफॉर्मर - १०० केव्हीए, एल.टी.लाईन - ०.१२ कि.मी., लागेल असे सांगितले. त्याचे उभारणीचे काम चालू आहे. ग्राहकास दि.३१.१०.२०१४ पर्यंत वीज जोडणीस मुदत मिळावी अशी मागणी केली.

खालील मुद्दा न्यायनिर्णयासाठी मंचाकडे उपस्थित होतो.

**मुद्दा क्र.१:** ग्राहकाने चलन देण्यास झालेल्या विलंबापोटी भरपाईची मागणी मंजुर करणे योग्य होईल काय ?

**उत्तर :** होय.

**मुद्दा क्र.२:** वीजजोडणीस झालेल्या विलंबापोटी मागितलेली भरपाई मंजुर करणे योग्य होईल काय ?

**उत्तर :** होय.

**मुद्दा क्र.३:** ग्राहकाची वीजजोडणीची मागणी मंजुर करणे योग्य होईल काय ?

**उत्तर :** होय.

## कारणमिमांसा

ग्राहकाने दि.३०.०१.२०१३ रोजी वीजजोडणीसाठी अर्ज केल्याचे वितरण कंपनीच्या अधिका-यांनी मान्य केले आहे. त्यानुसार दि.०९.५.२०१३ रोजी मंजुरी देऊन फर्म कोटेशन दि.२९.०५.१३ रोजी दिले आहे म्हणजे प्रतिमानकांनुसार चलन देण्याचा कालावधी संपल्यानंतर चलन दिले आहे. त्यास विलंब झाला आहे. दि.३०.३.२०१३ ते १४.५.२०१३ या काळात विलंबासाठी प्रति आठवडा रु.१००/- भरपाई वितरण कंपनीकडून मिळण्याचा हक्क प्राप्त झाला आहे व वितरण कंपनीची जबाबदारी आहे कारण प्रतिमानंके विनियमातील Rule 4.5 नुसार तीन महिन्यात वीजपुरवठा करणे आवश्यक आहे- त्यामुळे मुद्दा क्र.१ चे उत्तर **होय** असे देण्यात येते.

वितरण कंपनीच्या अधिका-यांनी मंचासमोर लेखी अहवालात कबुल केलेप्रमाणे दि.३१.१०.२०१४ पर्यंत ग्राहकास वीजजोडणी द्यावी व तसा अहवाल मंचास द्यावा. मंजुरीप्रमाणे ग्राहकास वीजपुरवठा करण्यासाठी एच.टी.लाईन - २.१ कि.मी. लाईन व १०० केव्हीए चा ट्रान्सफॉर्मर, एल.टी.लाईन ०.१२ कि.मी. उभारणी आवश्यक आहे. महाराष्ट्र शासन राजपत्र दि.२० मे,२०१४ नुसार महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, कृतीची मानके विनियम २०१४ अस्तित्वात आलेली आहेत. कनेक्शन मिळण्यासाठी होणा-या विलंबापोटी मिळणा-या भरपाईसाठी ग्राहकाने स्थानिक कार्यालयाकडेअर्ज करावा. ९० दिवसात भरपाई न मिळाल्यास ग्राहक मंचाकडे दाद मागु शकतो.

मुद्दा क्र.३ बाबत कंपनीच्या अधिका-यांनी आपल्या वरिष्ठांशी फोनवर चर्चा करुन मंचास लेखी अहवालात दि.३१.१०.२०१४ पर्यंत वीजजोडणी देतो अशी हमी दिली आहे. लेखी अहवालात व मंजुरीमध्ये शेतीपंपाची वीजजोडणीचे काम इन्फ्रामध्ये घेऊन वीजजोडणी देत आहे. त्यामुळे ग्राहकाची वीजजोडणीची मागणी मंजुर होईल.लेखी दिल्याप्रमाणे दि.३१.१०.२०१४ पर्यंत वीजजोडणी द्यावी.

## आदेश

१. तक्रार मंजुर करण्यात येत आहे.

२. वितरण कंपनीने ग्राहकास दि.०१.३.२०१३ ते १४.०५.१३ या काळात प्रति आठवडा रु.१००/- भरपाई चलन देण्यास झालेल्या विलंबापोटी द्यावी. सदर रकमेचे समायोजन ग्राहकाच्या दोन बिलिंग सायकलमध्ये करावे व तसा अहवाल मंचास द्यावा.

३. वितरण कंपनीने ग्राहकास मंचासमोर लेखी कबुल केलेप्रमाणे दि.३१.१०.२०१४ पर्यंत वीजजोडणी द्यावी व तसा अहवाल मंचास द्यावा.

४. सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

५. या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

सही/-
(बी.जी.पवार)
अध्यक्ष

श्री.जी.बी.पानकर, सदस्य सचिव .. सही/-

श्री.जी.सी.लेले, ग्राहक सदस्य .. सही/-

एकमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.